**परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय, मुंबई**

**प्रथम घटक चाचणी: २०२३-२०२४**

**इयत्ता: सातवी (७वी)** **गुण: ४०**

**विषय: मराठी (द्वितीय भाषा) Marathi 2nd lang.** **वेळ: १.३० मि.**

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न १. खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. ६ गुण

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. या भूमीला संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत सावता, संत एकनाथ, संत तुकाराम, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यासारंख्या संत परंपरेचा महान वारसा लाभला आहे. या सर्व संतांचे व अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरची विठू माऊली. पंढरपूर ही नगरी विठ्ठलाच्या नावानेच ओळखली जाते. विठ्ठलाची भक्ति करणारा तो वारकरी. आषाढ महिन्यातील एकादशी म्हणजेच देवशयनी एकादशी होय. आषाढ महिन्यात ज्ञानोबा माऊली तुकाराम या नामाचा गजर करत लाखों वारकरी पायी चालत पंढरपूरला येतात. महाराष्ट्रामध्ये सांस्कृतिक, धार्मिक, आणि आध्यात्मिकदृष्टया हा दिवस अतिशय महत्त्वाचा आहे. या दिवशी माऊली माऊली या जयघोषाने अवघा महाराष्ट्र रंगून जातो

प्रश्न:

१) महाराष्ट्र ही कोणाची भूमी म्हणून ओळखली जाते?
२) सर्व संतांचे व अवघ्या महाराष्ट्राचे दैवत कोणते?
३) कोणती नगरी विठ्ठलाच्या नावानेच ओळखली जाते?
४) महाराष्ट्राला कोणकोणत्या संत परंपरेचा महान वारसा लाभला आहे?
५) आषाढ महिन्यातील एकादशी चे दुसरे नाव कोणते?
६) वारकरी या दिवशी कोणता जयघोष करतात?

प्रश्न २. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार) ४ गुण

१) अरण्यलिपी म्हणजे काय?
२) हिरवे राघू कोठे उडत आहे?
३) पुस्तके कोणत्या गोष्टी सांगतात?
४) जनाई शेतात कोणते काम करीत होती?
५) वाघांची गणती कशावरून केली जाते?

प्रश्न ३. खालीलपैकी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दहा) १० गुण

१) निर्झर डोंगरातून ------- आवाज करत वाहतात. (खळखळ, सळसळ, भरभर)
२) जनाईला शेतात ______ दिसला. (वाघ, साप, मगर)
३) पुस्तके ----------ऐकवतात. (गोष्टी, गाणी, परीकथा )
४) वाघिणीचे पुढचे पाय -------- असतात. (गोल, त्रिकोणी, चौकोणी)
५) ______ हा रंग आकाशाला द्यायचा आहे. (निळा, लाल, गुलाबी)
६) पांढ-या रंगातून _______ रंग निघतात. (पाच, सात, आठ)
७) --------- पाल्याने जनाईचे अंग कापले होते. (उसाच्या, ज्वारीच्या,गहुच्या)
८) पावऊलवाटेवरून ----------- येतात. ( आई, भाऊ, सखेसोबती)
९) पुस्तकात --------- चिवचिवतात. (पाखरे, प्राणी माणसे)
१०) वाघिणीचे मागचे पंजे -------- आकाराचे असतात. (आयताकृती, त्रिकोणी, चौकोणी))

११) चित्रातील भिंती ------ रेषावरून तयार होतात. (दहा, चार, सात)

प्रश्न ४.अ) खालील जोडया जुळवा. २ गुण

| | |
|---|---|
| १) शेंगंचे वावर | अ) ज्ञानाची |
| २) हिरवे | ब) हिरवागार शालू |
| ३) उत्तुंग भरारी | क) रंग |
| ४) जादूचे | ड) राघू |

ब) खालील प्रश्नांची २ ते ३ ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही २) ४ गुण

१) जनाई शेतात कोणते काम करत होती?

२) 'वाघाचे क्षेत्र' कशावरून ओळखता येते?

३) 'इंद्रधनुष्यातील रंगांना' जादुच्या पेटीतील रंग का म्हटले आहे?

प्रश्न ५. सुचनेनुसार उत्तरे लिहा. ८ गुण

अ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)

१) घर २) आभाळ ३) जंगल

ब) विरुध्दार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)

१) वरचा २) लहान ३) दिवस

क) लिंग बदला. (कोणतेही दोन)

१) वाघ २) मोर ३) नर

ड) वचन बदला. (कोणतेही दोन)

१) पुस्तक २) घर ३) पेटी

प्रश्न ६. खालील सुचनेनुसार शब्दांच्या जाती ओळखा. (कोणतेही ६) ६ गुण

अ) राम शेतात काम करतो. (नाम ओळखा)

ब) गंगा ही भारतातील सर्वात मोठी नदी आहे. (विशेषण ओळखा)

क) मुले बागेत खेळतात. (क्रियापद ओळखा)

ड) आम्ही भारतीय आहोत. (सर्वनाम ओळखा)

ई) राजा सोमनाथाने भव्य राजवाडा बांधला. (विशेषण ओळखा)

फ) तो उद्या गावी जाणार आहे. (सर्वनाम ओळखा)

ग) अमित व सुमित नियमित शाळेत जातात. (नाम ओळखा)